# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः01.06.2024 वारःशनिवार

---

1. लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात 57 मतदारसंघांत मतदानाला सुरुवात
2. 2023-24 या वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 8 पूर्णांक 2 दशांश टक्के
3. बंगळुरू इथल्या राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि चेता विज्ञान संस्थेला नेल्सन मंडेला पुरस्कार जाहीर
4. पुण्यातल्या कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन आरोपीच्या आईला अटक, दोन परिचारिकांचीही गुन्हे शाखेकडून चौकशी आणि
5. आसाममध्ये पुरस्थिती बिकट, सर्व मोठ्या नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी

**निवडणूक**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यातील मतदानाला आज सकाळी 7 वाजता सुरुवात झाली. या टप्प्यात पंजाब, चंडीगड, उत्तर प्रदेश, बिहार, ओडीशा, हिमाचल प्रदेश आणि झारखंडमधल्या मिळून एकंदर57 लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर, भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद, काँग्रेसचे मनीष तिवारी, विक्रमादित्य सिंह, राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्या मीसा भारती आणि तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होईल. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी बिलासपूरमध्ये तर उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी गोरखपूरमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांनी मतदारांना भरघोस मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. ओडिशात उर्वरित 42 विधानसभा जागांसाठीही आज मतदान होत आहे.

**मतमोजणी तयारी**

देशात सात टप्प्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीची मतमोजणी येत्या चार जूनला होणार आहे. यासाठी विविध ठिकाणी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे जिल्ह्यातल्या पुणे, बारामती, मावळ, शिरूर या चार मतदारसंघांच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाल्याचं जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. या चारही जागांची मतमोजणी दुपारी चार वाजेपर्यंत पूर्ण होईल, अशी आशाही दिवसे यांनी व्यक्त केली.

**निवाडा जनतेचा-मुंबई**

मतमोजणीच्या दिवशी ताज्या निकालांच्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग सकाळी 9 वाजल्यापासून निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करणार आहे. तसंच निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम निवाडा जनतेचा सकाळी  वाजून पाच मिनिटांपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सादर करण्यात येईल.

**GDP**

आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये नोंदलेल्या 7 टक्के वाढीच्या तुलनेत भारताचा आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर म्हणजे GDP 8 पूर्णांक 2 दशांश टक्के राहिला. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मते, 2023-24 या वर्षात वास्तविक जीडीपी किंवा स्थिर किंमतींवरील जीडीपी 173 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त

पातळी गाठण्याचा अंदाज आहे. 2022-23 मधील वर्तमान किमतींनुसार जीडीपी 269 लाख कोटीहून अधिक होता. त्या तुलनेत 2023-24 मध्ये तो 295 लाख कोटींची पातळी गाठेल, असा अंदाज असल्याचं एका निवेदनात, मंत्रालयानं म्हटलं आहे.

आजची याबाबतची आकडेवारी आर्थिक वर्ष 2023-24 साठी 8 पूर्णांक 2 दशांश टक्के आणि आर्थिक वर्ष 2023-24 च्या चौथ्या तिमाही साठी 7 पूर्णांक 8 दशांश टक्के वाढीसह भक्कम आर्थिक वाढ दर्शवित असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. हा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा उल्लेखनीय दर जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक आहे, असंही त्यांनी सांगितलं. उत्पादन क्षेत्रानं 2023-24 मध्ये 9 पूर्णांक 9 टक्के लक्षणीय वाढ नोंदवली आहे. जागतिक आव्हानं असूनही भारतीय अर्थव्यवस्था लवचिक आणि उत्साहवर्धक राहिली आहे असं अर्थमंत्र्यांनी एका समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**जनसंवाद-इंटर्नशिप**

जलशक्ती मंत्रालयानं देशातील या क्षेत्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'जनसंवाद प्रशिक्षण' कार्यक्रम जाहीर केला आहे. या प्रशिक्षणार्थींना जलशक्ती मंत्रालयाअंतर्गत जल संसाधन, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभागात काम करण्याची संधी मिळेल. ज्या विद्यार्थ्यांनी जनसंवाद, पत्रकारिता किंवा संबंधित क्षेत्रातील पदवी पूर्ण केली आहे किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त महाविद्यालय किंवा विद्यापीठातून या क्षेत्रांमध्ये पदव्युत्तर पदवी किंवा पदविका करत असलेले विद्यार्थी या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. सहा ते नऊ महिन्यांचा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर निवडलेल्या उमेदवारांना प्रति महिना 15 हजार रुपये मानधन आणि प्रशिक्षणाचं प्रमाणपत्र दिलं जाईल. अर्ज करण्याची शेवटची तारीख 29 जून आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना जलशक्ती मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर याबद्दल अधिक माहिती मिळेल.

**नेल्सन मंडेला पुरस्कार**

बंगळुरू इथल्या राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि चेता विज्ञान संस्थेला जागतिक आरोग्य संघटनेनं 2024 साठी आरोग्य संवर्धनासाठीचा नेल्सन मंडेला पुरस्कार प्रदान केला आहे. ही संस्था आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय महत्त्वाची संस्था आहे. सर्वसमावेशक आरोग्य सेवेतील भारताच्या प्रयत्नांची ही ओळख असल्याचं सांगून केंद्रीय आरोग्य मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी संस्थेचं अभिनंदन केलं. केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनीही संस्थेचं अभिनंदन केलं आणि मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील भारताच्या प्रयत्नांना आणि कार्याला डब्ल्यूएचओ नं मान्यता दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**हौतीलाल समुद्र**

लाल समुद्रातल्या अमेरिकेच्या आयझेन हॉवर या विमानवाहू नौकेवर क्षेपणास्त्र डागले असून हल्ला अचूक झाला असल्याचं येमेनेच्या हौती गटानं म्हटलं आहे. हौती गटानं काल जारी केलेल्या निवेदनात, हा हल्ला अमेरिका-ब्रिटन युतीनं येमेनच्या विविध भागात हौती स्थानांवर केलेल्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून केल्याचं लष्कराचे प्रवक्ते याह्या सारेआ यांनी स्पष्ट केलं आहे. अमेरिका -ब्रिटननं संयुक्तपणे हौतीच्या ताब्यात असलेल्या जागांवर केलेल्या हल्ल्यात 16 लोकांचा मृत्यू झाला तर सामान्य नागरिकांसह 41 लोक मृत्युमुखी पडले. तर होडोदाह बंदरातल्या अनेक व्यावसायिक बोटीचं नुकसान झालं. गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरपासून हौती गटानं पॅलेस्टिनशी असलेले सहकार्य दर्शवण्यासाठी, लाल समुद्रातल्या इस्त्रायलशी संबंधित जहाजांना लक्ष्य करण्यासाठी जहाजविरोधी क्षेपणास्त्र आणि ड्रोन डागण्यास सुरुवात केली. प्रत्युत्तरादाखल अमेरिका-ब्रिटन नौदल युतीनं हौतीवर नियमित हवाई आणि क्षेपणास्त्र हल्ले केले.

**दक्षिण अफ्रिका निवडणूक**

दक्षिण आफ्रिकेत आंशिक निवडणुकीच्या निकालानंतर प्रथमच युती सरकार स्थापन होण्याकडे वाटचाल सुरू आहे. या निकालानंतर सत्ताधारी अफ्रिकन नॅशनल काँग्रेस-एएनसी बहुमतापासून दूर असल्याचं चित्र आहे. 90 टक्क्यांहून अधिक मतमोजणी झाली असून, बुधवारी झालेल्या निवडणुकीत एएनसी ला केवळ 41 टक्के मतं मिळाली होती तर डेमोक्रॅटिक अलायन्सला 21 टक्के मतं मिळाली आहेत. देशाचे माजी अध्यक्ष जेकब झुमा यांच्या एमके पक्षानं 13 टक्के मतं मिळवली आहेत. वर्णद्वेश संपुष्टात

आपल्यापासून एएनसी नं गेल्या तीस वर्षांपासून बहुमत मिळवलं होतं आणि गेल्या निवडणुकीत 2019 मध्ये त्यांना 57 पूर्णांक 5 दशांश टक्के मतं मिळाली.

**संसदेत स्वागत**

नवनिर्वाचित सदस्यांचं संसदेत स्वागत करण्यासाठी यावेळी लोकसभा सचिवालयाकडून अनेक व्यवस्था करण्यात आल्या आहेत. नोंदणी प्रक्रिया पूर्णपणे कागद रहित आणि तंत्रज्ञानावर आधारित असेल. नवनिर्वाचित सदस्यांची नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन करण्यात येणार असून नामांकन, राहण्याची सोय आणि इतर अनेक बाबींशी संबंधित सर्व व्यवहार सुलभ आणि जलद पूर्ण करण्याचा प्रयत्न असणार आहे. शनिवार आणि रविवारसह 5 ते 14 जून या कालावधीत नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार आहे.

**प्रभावी लेखापरीक्षा समिती**

नवी दिल्ली इथं काल 'प्रभावी लेखा परीक्षा समिती: सुशासन संवर्धन' या विषयावर आंतरराष्ट्रीय गोलमेज परिषदेचं आयोजन केलं होतं. राष्ट्रीय वित्तीय अहवाल प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉक्टर अजयभूषण प्रसाद पांडे यांनी या परिषदेला संबोधित केलं. किरकोळ आणि खाजगी क्षेत्रातील सार्वजनिक सहभागामध्ये अभूतपूर्व वाढ झाली असून भारत हे बचतकर्त्यांच्या राष्ट्राऐवजी गुंतवणूकदारांचे राष्ट्र बनलं आहे, 2020 मध्ये देशात सुमारे तीन कोटी डिमॅट खाती होती, ही संख्या आज सुमारे 14 कोटी झाली आहेत, असं यावेळी डॉक्टर पांडे यांनी अधोरेखित केलं.

**पुणे कार अटक**

पुण्यातल्या कल्याणीनगर कार अपघातात अल्पवयीन आरोपीच्या आईला शिवानी अगरवाल हिला काल पुणे पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीच्या रक्तनमुन्यांच्या कथित अदलाबदलीच्या प्रकरणात ही अटक करण्यात आली आहे. आरोपीच्या रक्ताच्या नमुने बदलून त्याला बाहेर पडण्यासाठी मदत केल्याचा संशय आहे. शिवानी अगरवालला पुणे न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. दरम्यान, या प्रकरणातील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत काम करणाऱ्या दोन महिला परिचारिकांची चौकशीही गुन्हे शाखेकडून करण्यात आली. या प्रकरणात रक्ताचे नमुने बदलण्यात डॉ. तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांची भूमिका महत्त्वाची असल्याचं आजवरच्या तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच अनुषंगाने ही चौकशी करण्यात आली. रक्ताचे नमुने कुठे टाकण्यात आले, याबाबतही त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली.

**आसाम पूर**

रेमल चक्रीवादळामुळे आसाममध्ये पुरस्थिती बिकट झाली आहे. यामध्ये 6 लोकांचा बळी गेला आहे. वादळामुळे होणाऱ्या संततधार पावसामुळे इथल्या सर्व मोठ्या नद्या धोक्याची पातळी सोडून वाहात असल्याने 11 जिल्ह्यांतल्या साडेतील लाख लोकांना फटका बसला आहे. पुरामुळे सुमारे साडपाचशेहून अधिक गावं बाधित झाली असून जवळपास साडेचार हजारहून अधिक हेक्टर शेतीचं नुकसान झालं आहे. राज्य सरकारच्या वतीनं 148 मदत शिबिरं आणि 39 मदत केंद्रे सुरू करण्यात आली असून, बाधित गावांमध्ये बचाव आणि मदत कार्यासाठी केंद्र आणि राज्य आपत्ती दलाच्या तुकड्याही तैनात करण्यात आल्या आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.